Shri Narayanrao Babasaheb Education Society's
SHRI VENKATESH MAHAVIDYALAYA, ICHALKARANJI
ISO 9001 : 2015 Certified

सत्क्रिया आचरावी
Estd. 1983

# VENKATESH BULLETIN

• प्रेरणा : श्री ना. बा. एज्यु. सोसायटी, इचलकरंजी • प्रेसिडेंट : श्री. श्रीनिवासजी बोहरा • चेअरमन : श्री. हरिषजी बोहरा • ऑ.सेक्रेटरी : श्री. बाबासाहेब वडींगे •

• संपादक : प्राचार्य डॉ. विजय ए. माने • कार्यकारी संपादक : डॉ. सौ. सारिका आर. ठाकर • सहसंपादक : प्रा. महेश पी. केसरकर • वर्ष पहिले, अंक पहिला : ऑक्टो. २०२१ ते जाने. २०२२ •

कार्यालयीन संपर्क : 0230 - 2424534, 240380 mshrivenkatesh@yahoo.com www.venkateshcollege.com



## संपादकीय मनोगत

विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये महाविद्यालयीन शिक्षणाचा एक अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा असतो. या काळातच विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळया प्रकारची कौशल्ये, कलागुण, सकारात्मकता व सृजनशीलतेचा विकास होत असतो. विद्यार्थ्यांमधील कलागुणांचा व यशाचा आढावा घेण्यासाठी चालू शैक्षणिक वर्षापासूनच 'व्यंकटेश बुलेटीन' हे सहामाही वार्तापत्र आम्ही सुरू करीत आहोत. जगात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. तरीही अशा विदारक स्थितीमध्ये पारंपारिक शिक्षण पद्धतीसोबतच तंत्रज्ञानावरती आधारित ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा वापर करुन चालू शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाने विविध क्षेत्रात केलेल्या दैदिप्यमान कामगिरीचे अवलोकन करण्यासाठी आम्ही हे बुलेटिन सुरू करीत आहोत.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी कै. मदनलालजी बोहरा शेठजी यांनी इचलकरंजी या वस्त्रनगरीत १९८३ साली महाविद्यालयाची स्थापना केली. आज या महाविद्यालयात २१५८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. श्री.ना.बा.शिक्षण संस्थेचे महामेरू कै. मदनलालजी बोहरा शेठजी व प्रेसिडेंट श्री. श्रीनिवासजी बोहरा शेठजी व चेअरमन श्री. हरीषजी बोहरा यांच्या मार्गदर्शनात आज महाविद्यालय सर्व स्तरावर आपली उन्नती करीत आहे. याची दखल घेत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने सलग तिसऱ्यांदा महाविद्यालयास निमशहरी विभागात प्रथम क्रमांकाने गौरविले आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येण्याची आमच्या महाविद्यालयाची परंपरा कायम आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी शैक्षणिक प्रगतीप्रमाणे सांस्कृतिक, सामाजिक व कीडा क्षेत्रातही कामगिरी करतात. महाविद्यालयातील माझे सहकारी प्राध्यापकही विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासा साठी विविध विभागांतर्गत अनेक उपक्रम राबवितात.

विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्याने, करिअर गाईडन्स् उपक्रम आयोजित केले जातात. माझ्या महाविद्यालयातील अनेक माजी विद्यार्थी सी.ए. आहेत. वेगवेगळया क्षेत्रात माजी विद्यार्थी स्वत:चे व महाविद्यालयाचे नाव लौकिक करीत आहेत, याचा मला अभिमान आहे.

महाविद्यालयातील गुणी विद्यार्थी व माझे कार्यनिष्ठ सहकारी यांमुळे माझ्या महाविद्यालयास आय.एस.ओ.मानांकनही मिळाले आहे. महाविद्यालयाची यशोगाथा या अंकरूपाने आपणा सर्वापुढे मांडण्याचा आमचा प्रयत्न आहे. व्यंकटेश बुलेटिन महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांसाठीचा मंच आहे. महाविद्यालयाच्या कामगिरीसोबतच नव्या सृजनशील कल्पकता यातून सादर होण्याच्या दृष्टीने हे बुलेटिन महत्त्वाचे आहे. या अंकाच्या निर्मितीसाठी सहभागी असणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन व धन्यवाद !

– प्राचार्य डॉ. विजय ए. माने

## शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत श्री व्यंकटेश महाविद्यालयाची प्रथम क्रमांकाची हॅट्रीक



शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेतील पात्र विद्यार्थ्यांसमवेत संस्था प्रेसिडेन्ट, श्री. श्रीनिवासजी बोहरा, संस्था, विश्वस्थ श्री. महेश बांदवलकर, प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने सर, श्री. अमीन बाणदार सर

श्री व्यंकटेश महाविद्यालय हे गुणवत्तेमध्ये अग्रेसर आहेच पण शिवाजी विद्यापीठाकडून हे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याने एक प्रकारे त्यावर शिक्कामोर्तबच झाले आहे. असे मत गुणवत्ता शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे प्रेसिडेन्ट श्री. श्रीनिवासजी बोहरा यांनी मांडले.

व्यंकटेश महाविद्यालयास सलग तिसऱ्या वर्षी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत वाणिज्य शाखेतून २०२० – २१ निमशहरी गटातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना केंद्र शासन, राज्य शासन तसेच विद्यापीठाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्ती साठी प्राधान्याने प्रयत्न केले जातात. याच प्रयत्नांमधून शैक्षणिक वर्ष १८–१९, १९–२० व २०–२१ मध्ये केंद्र शासन, राज्य शासन तसेच विद्यापीठाकडून मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. ही शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी महाविद्यालयातील मुख्य लिपिक श्री. अनोश गायकवाड, कनिष्ठ लिपिक श्री. महेश चौगुले, तसेच सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. त्याप्रसंगी ते म्हणाले, 'गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक येण्याची महाविद्यालयाने हॅट्रिक केली असून यापुढे असेच यश संपादन करू याची हमी देतो'. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त श्री. महेश बांदवलकर, क्रीडा शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार व विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी कु. मयुरी प्रकाश वरदायी हिची पोस्ट खात्यामध्ये ब्रँच पोस्टमास्तर म्हणून निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गुणवत्ता शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी व पालक तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## आय.एस.ओ. मानांकन कमिटीची महाविद्यालयास भेट




आय.एस.ओ. समितीच्या भेटीसाठी आलेल्या ऑडिटर सौ. सेजल रुपलग व श्री. समीर रुपलग यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने सर, उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. एन. एम. मुजावर व इतर स्टाफ

महाविद्यालयास आय.एस.ओ. मानांकन कमिटीने भेट दिली. महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ मध्ये आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. त्यानुसार तीन वर्षांसाठी महाविद्यालयाच्या प्रशासकीय, शैक्षणिक, इतर सुविधा या सर्व बाबींचे ऑडिट केले जाते. त्यानुसार या कमिटीचे ऑडिटर सौ. सेजल रूपलग व समीर रूपलग यांनी महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली. ऑडिट पूर्ण करण्यासाठी समन्वयक प्रोफेसर डॉ. एन. एम. मुजावर यांच्यासह प्राध्यापकांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. विजय माने यांनी महाविद्यालयातील संशोधनाची चालना व प्रगतीबाबत मार्गदर्शन केले. डॉ. एस. एच. आंबवडे यांनी आभार मानले.

## शिवाजी विद्यापीठाच्या ॲकॅडमिक ऑडिट समितीची महाविद्यालयास भेट




शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याकडून महाविद्यालयात ॲकॅडमिक ऑडिट करण्यासाठी समितीने भेट दिली. या समितीमध्ये चेअरमन म्हणून मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगावचे प्राचार्य डॉ. जे. एम. म्हेत्रे तर सदस्या म्हणून देशभक्त अण्णाराव बळवंत नाईक आर्ट्स ॲंड सायन्स कॉलेज, चिखली येथील प्राध्यापिका डॉ. रेखा आर. देवकर हे उपस्थित होते. भेटीदरम्यान संपूर्ण महाविद्यालयाची तपासणी करण्यात आली.

महाविद्यालयाच्या प्रगती व गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत समितीने समाधान व्यक्त केले. महाविद्यालयातील भौतिक सुविधा, अध्ययन व अध्यापन कार्य, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिकसुविधा, महाविद्यालयातील खेळांच्या सुविधा अशा विविध मुद्यावर महाविद्यालयाची सखोल तपासणी करण्यात आली. उपप्राचार्य प्रोफेसर डॉ.एन.एम. मुजावर यांनी समितीसमोर सर्व परिपूर्ण कागद-पत्राद्वारे सादरीकरण केले.

## शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय खो-खो स्पर्धेचे आयोजन : खिलाडूवृत्तीसह चुरशीच्या सामन्यांनी रंगत वाढविली



शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय खो–खो स्पर्धेचे उद्घाटन करताना संस्था सचिव मा. बाबासाहेब वडींगे व इतर मान्यवर

महाविद्यालयात झालेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय पुरुष गटातील खो–खो स्पर्धेत इचलकरंजीच्या नाईट कॉलेजने विजेतेपद पटकावले. .हातकणंगलेच्या आण्णासाहेब डांगे महाविद्यालयाचा संघ उपविजेता ठरला. तर कुरुंदवाडचे एस. के. पाटील महाविद्यालय तिसऱ्या स्थानी, श्री व्यंकटेश महाविद्यालय चौथ्या स्थानी राहिले. या चारही संघांची कुरुंदवाड येथे होणाऱ्या विद्यापीठाच्या आंतर विभागीय खो–खो स्पर्धेसाठी निवड झाली.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यावतीने इचलकरंजी येथील श्री व्यंकटेश महाविद्यालयात जिल्हा विभागीय खो–खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन श्री. ना.बा एज्युकेशन सोसायटीचे सचिव बाबासाहेब वडींगे यांच्या हस्ते झाले. सलामीच्या सामन्यात नाईट कॉलेजने आजरा महाविद्यालयावर एकतर्फी विजय मिळवला. स्पर्धेत जिल्ह्यातून ८ संघ सहभागी झाले होते. अंतिम सामन्यात सुरुवातीला नाईट कॉलेज विरुद्ध डांगे कॉलेज संघात चुरस पहायला मिळाली. मध्यंतरीपर्यंत १२–७ अशा गुण फरकाने ५ गुणांची आघाडी नाईट कॉलेजने घेतली. आघाडी कायम ठेवत अंतिम सामन्यात तब्बल १० गुणांनी नाईट कॉलेजने स्पर्धेचे विजेतेपद मिळवले.

संस्थेचे मा. बाबासाहेब वडींगे, प्राचार्य डॉ. विजय माने, शारिरीक शिक्षण संचालक प्रा. आय.एच. मुला, प्रा. अमीन बाणदार यांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धा यशस्वीतेसाठी खो–खो असोसिएशन कोल्हापूरचे पंच यांच्यासह महेश चौगुले, प्रा. अमित कागले,अरुण कोष्टी, भिकाजी माने, अमित पाटील यांनी परिश्रम घेतले. यावेळी उपप्राचार्य डॉ.एन.एम. मुजावर, अनोश गायकवाड, प्रा. येवेन आवळे, डॉ. रतन नाईकनवरे, प्रा. देवेंद्र बिरनाळे, रमेश पाटील उपस्थित होते.

| संपादक मंडळ | संपादक | कार्यकारी संपादक | सहसंपादक | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्राचार्य डॉ. विजय ए. माने | डॉ. सौ. सारिका आर. ठाकर | प्रा. महेश पी. केसरकर | प्रा. अमीन आय. बाणदार | प्रा. शरणाप्पा बी. मलघाण | प्रा. सौ. शुभांगी टी. बिरंजे | प्रा. आनंदा बी. विभूते |

## जागतिकीकरण युगात प्रॅक्टिकल अकौंटन्सीचे ज्ञान गरजेचे - प्रोफेसर डॉ. एस. एस. महाजन



शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या कॉमर्स आणि मॅनेजमेंट विभागाचे विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. एस. एस. महाजन यांचे स्वागत करताना

''जागतिकीकरणानंतर जगातील अकौंटन्सीसाठी इंटरनॅशनल फायनान्सिंग रिपोर्टिंग स्टॅन्डर्स म्हणजे आय. एफ. आर. एस. झाले. त्याचा आधार घेऊन भारतासाठी ए. एस. स्टॅन्डर्स लागू करण्यात आले आहेत. म्हणून आजच्या विद्यार्थ्यांनी अकौंटन्सी म्हणजे फक्त आकडेमोड यामध्ये न अडकता समाजातील प्रत्येक क्षेत्रांमधील अकौंटन्सीकडे वळले पाहिजे'' असे मत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील कॉमर्स आणि मॅनेजमेंट विभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. महाजन यांनी 'अकौंटन्सी विषयाच्या समकालीन बाबी' या विषयावरील व्याख्यानात मांडले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. एन.एम. मुजावर यांनी केले. या कार्यक्रमावेळी प्रोफेसर डॉ. एस. एस. महाजन यांना यावर्षी शिवाजी विद्यापीठाचा 'गुणवंत प्राध्यापक पुरस्कार' प्राप्त झाले बाबत महाविद्यालयाकडून त्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिकृती, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सहप्राध्यापिका कु. मोहिनी आंचलिया यांनी तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. एस. एच. आंबवडे यांनी मांडले. कार्यक्रमासाठी डॉ. बी. एन. कांबळे, सौ. एस. टी. बिरंजे, आर. यू. सिद, ग्रंथपाल एम. पी केसरकर, डी. आर कदम, श्री. अनोष गायकवाड, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'वाणिज्य शाखेतील सर्वोत्तम नोकरी मिळविण्यासाठीच्या युक्त्या' या विषयाचे मार्गदर्शन




महाविद्यालयात कॉमर्स असोसिएशन व निलया फाऊंडेशन, पुणे यांच्यातील ''सामंजस्य कराराअंतर्गत वाणिज्य शाखेतील सर्वोत्तम नोकरी मिळविण्यासाठीच्या युक्त्या'' या विषयाचे व्याख्यान घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या गौरी कुलकर्णी (निलया फाऊंडेशन, पुणे) यांनी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्तम करिअर करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की. विद्यार्थ्यांकडे बुद्धीचातुर्य, बुद्धीकौशल्य, भरपूर ज्ञानसंपदा, अथक परिश्रम करण्याची तयारी असणे गरजेचे आहे. उत्तम नोकरी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्थितप्रज्ञ, आत्मविश्वास व स्वत:चे लक्ष निश्चित करून त्यासाठी अपार परिश्रम करावे. विद्यार्थी विकास हा मानवी सक्षमता, अंतरबाह्य व्यक्तिमत्व, नैतिकता, तत्वे यावर अवलंबून असतो, असे व्याख्यात्यांनी सांगितले.

तसेच प्राचार्य डॉ.व्ही.ए.माने सर यांनी सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांसमोरील संधी व त्याविषयी विद्यार्थ्यांनी कोणती मानसिक, शैक्षणिक तयारी करावी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहिनी आंचलिया मॅडम, तर आभार उपप्राचार्य व कॉमर्स विभाग प्रमुख डॉ एन. एम.मुजावर सर यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाविद्यालयाची रुचिता बोरा एम.कॉम. परीक्षेत विद्यापीठ गुणवत्ता यादीत



महाविद्यालयाने गुणवत्ता यादीमध्ये येण्याची आपली परंपरा कायम राखली असून एम. कॉम. मार्च २०२१ परीक्षेमध्ये कुमारी रुचिता बोरा ही विद्यापीठ गुणवत्ता यादी मध्ये आठवी आली आहे. याबद्दल महाविद्यालयांमध्ये तिच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे प्रेसिडेन्ट मा. श्री. श्रीनिवासजी बोहरा, संस्था सदस्य श्री. एस. बी. चंगेडिया, श्री. एम. एस. बांदवलकर उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने म्हणाले, ''महाविद्यालय स्थापनेपासून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत विद्यार्थी येण्याची परंपरा सुरूच असून निमशहरी भागांमध्ये महाविद्यालयाने कॉमर्सचा वेगळा ठसा उमटविला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एम. कॉम. विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. एन. एम. मुजावर यांनी केले. त्यांनी महाविद्यालय स्थापनेपासूनची वाटचाल सांगत विद्यार्थिनींचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे आभार डॉ. बी. एन. कांबळे यांनी मानले. कार्यक्रमास एम.कॉम. विभागाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## विश्वस्त आणि मान्यवरांच्या हस्ते 'मदनामृत'अंकाचा प्रकाशन सोहळा संपन्न



महाविद्यालयामध्ये 'मदनामृत' या वार्षिक अंकाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने यांनी केले. सुरुवातीला महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे नाव सुदर्शन असे होते, परंतु संस्थेचे अध्यक्ष कै. मदनलालजी बोहरा यांच्या नावाचा समावेश व त्यांची आठवण म्हणून या वर्षापासून वार्षिक अंकास 'मदनामृत' असे नाव देण्याचे ठरले. या अंकाचा प्रकाशन सोहळा मोठया दिमाखात पार पाडण्यात आला. 'मदनामृत' वार्षिक अंकामध्ये महाविद्यालयामध्ये वर्षभरातील घेतले जाणारे विविध उपक्रम, प्राध्यापकांनी केलेले नाविण्य पूर्ण काम, राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा, ग्रंथालय, विद्यार्थ्यांचे विविध उपक्रम, शॉर्टटर्म कोर्स, नॅक संदर्भात घेतलेले उपक्रम इ. बाबींचा समावेश केला जातो, असे मा. प्राचार्य डॉ. विजय माने यांनी सांगितले. तसेच या वर्षापासून मा. मदनलालजी बोहरा शेठजी यांची जयंती श्री. ना.बा. एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाखांनी एकत्रीत करण्याचे ठरले व जयंती निमित्त कै. मदनलालजी बोहरा शेठजी यांच्या संपूर्ण कार्यावर स्मरणिका प्रकाशीत करण्याचे ठरले.

संस्थेचे सेक्रेटरी श्री. बाबासाहेब वडिंगे यांनी संस्थापक मदनलालजी बोहरा शेठजी यांचा इचलकरंजी शहरामध्ये आल्यापासून त्यांच्या व्यापारी व शैक्षणिक प्रगतीचा लेखाजोखा मांडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे प्रेसिडेंट श्रीनिवासजी बोहरा यांच्या हस्ते मदनामृत अंकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मान. मदनलालजी बोहरा यांचे श्री. ना.बा. एज्यूकेशन सोसायटीच्या शिक्षण संकुलाच्या विकासामध्ये अनमोल योगदान आहे, असे सांगितले. या अंकाच्या प्रकाशन सोहळयासाठी संस्थेचे मान्यवर मा.लक्ष्मीकांत मावजी पटेल, मा.मारूती दत्तोबा निमनकर, मा.महेश शंकरराव बांदवलकर, सत्यनारायण मंसाराम ओझा, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एन. एम. मुजावर, संपादक डॉ. बी.एन.कांबळे, सहसंपादक डॉ.सारीका ठाकर, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. संपादक डॉ. बी.एन.कांबळे यांनी आभार मानले.

## श्री व्यंकटेश महाविद्यालामार्फत शिवाजी विद्यापीठ चाचणी व जलतरण स्पर्धांचे यशस्वी आयोजन



शिवाजी विद्यापीठ निवड चाचणी जलतरण स्पर्धा उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने व क्रीडा संचालक श्री. अमीन बाणदार

कोविड-१९ च्या कालावधीत सर्व अटी व नियमांचे पालन करून क्रीडा विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने कै. शंकरराव पुजारी जलतरण तलाव इचलकरंजी येथे पुरुष व महिला गटासाठी आंतरविभागीय जलतरण स्पर्धा, डायव्हिंग व निवड चाचणी घेण्यात आली. या स्पर्धेचे उदघाटन प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांच्या हस्ते झाले. या निवडीसाठी शिवाजी विद्यापीठ निवड समिती चेअरमन प्रा. सुनील खराडे, सदस्य डॉ. सौ. कांबळे व डॉ. महेश पाटील हे उपस्थित होते. स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयातील क्रीडा विभाग प्रमुख श्री. अमीन बाणदार यांनी केले. सदर स्पर्धेसाठी सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातील ६५ विद्यार्थी सहभागी होते.

## व्यंकटेश महाविद्यालय व डी. के. टी.ई. यांच्यामध्ये सामंजस्य करार



डी.के.टी.ई. सोबत सामंजस्य करार करताना डॉ. व्ही. ए. माने सर व डी.के.टी.ई. संकुलाचे संचालक डॉ. पी. व्ही. कडोले व मान्यवर

श्री व्यंकटेश महाविद्यालय व डी.के.टी.ई. या शैक्षणिक संस्थांमध्ये विविध गोष्टींसाठी सामंजस्य करार करण्यात आला. यामध्ये कंपनीसाठी लागणारे तांत्रिक कौशल्य व ज्ञान प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना देणे. सेमिनार प्रकल्प अहवाल व स्पर्धा परीक्षा याबाबत मार्गदर्शन करणे, विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक होण्यासाठी महत्वकांक्षा निर्माण करण्यासाठी तांत्रिक कौशल्य द्वारे मार्गदर्शन करणे, विविध कंपन्यांमधील नोकरी संदर्भात मुलाखत देण्यासाठी लागणाऱ्या कौशल्यं बाबत मार्गदर्शन करणे अशा विविध विषयावर हा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या कराराप्रसंगी शैक्षणिक संकुलाचे संचालक डॉ. पी.व्ही. कडोले यांनी डी.के.टी.ई.च्या शैक्षणिक प्रगतीचा अहवाल प्राचार्य डॉ. व्ही.ए. माने यांना सादर केला. तसेच संकुलाच्या विविध विभागातील अद्ययावत तंत्रज्ञान दाखवण्यात आले. श्री व्यंकटेश महाविद्यालयास नेहमी सहकार्य लाभेल अशी हमी त्यांनी दिली. या करारा प्रसंगी डी.के.टी.ई. मार्फत संचालक डॉ. पी. व्ही. कडोले, एम.बी. ए. विभाग प्रमुख डॉ.आर.यू. कंठे, प्रा. व्ही. वाय. बडवे, प्रा.पी. एस. जाधव, प्रा. ए.एस. गणपते तर श्री व्यंकटेश महाविद्यालय मार्फत प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने, पी. पी. दाईंगडे, कुमारी डी. ए. बागल, श्री. यु. बी. नदाफ, ग्रंथपाल एम. पी. केसरकर, श्री.अनोश गायकवाड उपस्थित होते. निश्चितपणे या सामंजस्य कराराचा फायदा विद्यार्थ्यांना होईल. अशी आशा दोन्ही शैक्षणिक संकुलाकडून व्यक्त करण्यात आली.

## उत्कृष्ट करियर संधीसाठी अविरत अभ्यास व कठोर परिश्रमाची आवश्यकता - प्रा. डॉ. कृष्णा पाटील



'पदवीनंतर विद्यार्थ्यांना बँकिंग, स्पर्धा परीक्षा, एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी. तसेच आय.टी. अशा विविध क्षेत्रामध्ये करिअर करता येते. विद्यार्थ्यांनी पदवीच्या सुरुवाती पासूनच आपल्या क्षेत्राची निवड करून त्यास अभ्यासाची आणि कठोर परिश्रमाची जोड दिली तर विद्यार्थी निश्चित यशस्वी होऊ शकतो'. असे प्रतिपादन राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील प्राध्यापक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. ते महाविद्यालयातील अकाउंटन्सी असोसिएशन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी महाविद्यालयात अकाउंटन्सी असोसिएशनचे उद्घाटन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. एच. अंबवडे यांनी मांडले. पाहुण्यांची ओळख सौ . एस. टी. बिरंजे यांनी करून दिली. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. एन. एम. मुजावर, डॉ. बी. एन. कांबळे, ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. एस. ए. होगाडे यांनी मांडले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रत्येक महाविद्यालयात कॉमर्स असोसिएशनची गरज - डॉ. के.व्ही. मारुलकर



महाविद्यालयात कॉमर्स असोसिएशनचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयांमध्ये विषयानुसार असोसिएशनची स्थापना केल्यानंतर त्या विषयाशी निगडित विविध कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन होते व विद्यार्थी त्या विषयाची समरस होतो असे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्राचार्य डॉ. व्ही.ए. माने यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठामधील डॉ. के. व्ही. मारुलकर हे उपस्थित होते. मार्गदर्शनपर बोलताना ते म्हणाले 'प्रत्येक महाविद्यालयात विषयानुसार असोसिएशनची स्थापना गरजेची असून अध्यापन व्यतिरिक्त विविध कार्यक्रमामुळे विद्यार्थी त्या विषयाशी जोडले जातात.तसेच येथील असोसिएशन उद्घाटनाचा हेतू निश्चित साध्य होईल. असे मत व्यक्त केले. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## स्वयंम् सेलमार्फत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन



केंद्र सरकारच्या स्वयंम् या मुक्त शिक्षण उपक्रमाअंतर्गत येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी महाविद्यालयातील स्वयंम् सेल अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

नोकरी, व्यवसाय व महाविद्यालयीन शिक्षण करत असताना वेगवेगळ्या विषयाचे ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी स्वयंम् या उपक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. स्वयंम् याचा अर्थ स्टडी वेब ऑफ ॲक्टिव्ह लर्निंग फॉर यंग अस्पायरिंग माइन्ड्स म्हणजे तरुण महत्त्वकांक्षी मन असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन पद्धतीने शिक्षण घेता येते.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना स्वयंम् प्लॅटफॉर्म द्वारे कोणते ऑनलाइन कोर्सेस करता येतात याचे मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री मयुरेश भांबुरे यांना निमंत्रित करण्यात आले होते. ते बोलताना म्हणाले ''स्वयंम् वरील सर्व कोर्सेस हे तज्ञ व्यक्ती तसेच अतिशय प्रतिष्ठित शिक्षण संस्था विद्यापीठे यांच्यामार्फत तयार केले जातात. त्यामुळे स्वयंम् कोर्सेस मार्फत अतिशय उत्कृष्ट असे ज्ञान आपणास प्राप्त होते. म्हणून विद्यार्थ्यांनी पारंपारिक शिक्षणाबरोबर स्वयंम् चे कोर्सेस केल्यास विद्यार्थी परिपूर्ण होऊन विद्यार्थ्यास स्वतःचे करिअर घडविण्यासाठी उपयोग होतो. तसेच विद्यार्थी परिपूर्ण होण्यासाठी प्रात्यक्षिक ज्ञान, तांत्रिक ज्ञान, सैद्धांतिक ज्ञान, सॉफ्ट स्किल्स, निर्णय क्षमता, उत्तम संप्रेषण या विविध गुणांचा विकास करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यास विविध प्लॅटफॉर्मवरील कोर्सेसचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

यासाठी स्वयंम्, स्वयंप्रभा चॅनेल , कोर्स वेअर, लींकडीन प्लॅटफॉर्म, इडिक्स ऑनलाइन प्लॅटफॉर्म हे प्लॅटफॉर्म उपलब्ध आहेत. तसेच स्वयंम् रजिस्ट्रेशन पद्धती, फी स्वरूप, परीक्षा पद्धती, सर्टिफिकेशन इत्यादी विषयी मार्गदर्शन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ.एस.एन. जरंडीकर यांनी करुन दिली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार कु. मोहिनी आंचलियाने मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्याल यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीमंत नारायणराव बाबासाहेब एज्युकेशन सोसायटीच्या नूतन प्रेसिडेन्ट यांचा सत्कार



श्री.नारायणराव बाबासाहेब एज्युकेशन सोसायटीचे नूतन प्रेसिडेन्ट पदी श्री. श्रीनिवासजी बोहरा यांची निवड झाली. कै. मदनलालजी बोहरा यांच्या निधनाने हे प्रेसिडेन्ट पद रिक्त झाले होते,संस्था संचालकांच्या बैठकीमध्ये एकमताने श्री. श्रीनिवासजी बोहरा यांची प्रेसिडेन्ट पदी निवड करण्यात आली. त्यामुळे आपल्या महाविद्यालयामध्ये त्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना संस्थेचे चेअरमन श्री. हरीषजी बोहरा म्हणाले. ''कै. मदनलालजी बोहरा यांनी संस्थेच्या विकासासाठी अहोरात्र कष्ट घेतले आणि संस्था नावारूपास आणली. त्यामुळे यापुढे या संस्थेचा विकास करण्याची मोठी जबाबदारी श्री. श्रीनिवासजी बोहरा यांच्यावर पडली आहे. निश्चितपणे ते वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून काम करतील''

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन नूतन प्रेसिडेन्टचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए.माने म्हणाले, ''महाविद्यालय उभारणीसाठी व विकासासाठी प्रसिडेन्ट श्री. श्रीनिवासजी बोहरा हे निश्चित आपणास साथ देतील. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय नवीन उंची गाठण्यासाठी निश्चित प्रयत्न करेल. ज्याप्रमाणे कै. मदनलालजी बोहरा शेठजी यांनी महाविद्यालय विकासासाठी प्रयत्न केले व महाविद्यालय नावारुपास आणले, त्याप्रमाणे नवनियुक्त प्रेसिडेंट श्री. श्रीनिवासजी बोहरा यांच्या छत्र छायेखाली महाविद्यालयाच्या लौकिकामध्ये भर पडेल.''

यावेळी सर्व स्टाफशी ओळख प्राचार्य डॉ. श्री. व्ही. ए. माने यांनी करून दिली. यावेळी महाविद्यालयातील बी. कॉम. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. सानिका दिनेश फडके हिने शिवाजी विद्यापीठ द्वारा आयोजित युवा महोत्सवामध्ये शास्त्रीय गायनात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल तिचा सत्कार नूतन अध्यक्ष श्री. श्रीनिवासजी बोहरा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. एन. एम. मुजावर तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## कर्मवीर पद्मभूषण डॉ.भाऊराव पाटील हेच महाराष्ट्रातील प्रगत शिक्षणाचे शिल्पकार - प्राचार्य डॉ. व्ही. ए.माने



कर्मवीर पद्मभूषण डॉ. भाऊराव पाटील यांनी खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील गरीब विद्यार्थ्यांना सन १९१९ साली सातारा जिल्ह्यातील काले येथे पहिले हायस्कूल काढून शिक्षणाची दारे खुली केली. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आज महाराष्ट्र व कर्नाटक येथे ४५० पेक्षा अधिक हायस्कूल तर ४२ पेक्षा अधिक उच्च शिक्षण संस्था कार्यरत आहेत. यामध्ये सध्या ४,५०,००० पेक्षा अधिक विद्यार्थी शिकत असून १२,००० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत. असे वक्तव्य श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी कर्मवीर पद्मभूषण डॉ. भाऊराव पाटील यांच्या जयंती कार्यक्रमावेळी काढले. पुढे बोलताना ते म्हणाले, आज रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था असून यामध्ये शिक्षण घेणाऱ्या गरीब होतकरू विद्यार्थ्यांना 'कमवा आणि शिका' ही योजना सुरू करून स्वावलंबी होण्याचे धडे विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच दिले जातात.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू बॅरिस्टर डॉ. पी. जी. पाटील यांच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी आण्णांनी उचलली. बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करताना विद्यार्थ्यांमध्ये बंधुता व समता रुजावी यासाठी त्यांनी शिक्षणातून समता व बंधुता याचे संस्कार विद्यार्थ्यांवर केले. अशा कर्मवीर पद्मभूषण डॉ. भाऊराव पाटील यांची १३४ वी जयंती व्यंकटेश महाविद्यालयामध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर तसेच शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अमीन बाणदार तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## रक्तदान हेच खरे श्रेष्ठदान - श्री. हरीष बोहरा




रक्तदान शिबिर कार्यक्रमावेळी संस्था चेअरमन, श्री. हरिषजी बोहरा शेठजी, प्राचार्य डॉ. व्ही.ए. माने, उपप्राचार्य डॉ. मुजावर समवेत स्टाफ

जेव्हा आपण रक्तदान करतो तेव्हा आपण कोणाचा तरी जीव वाचवण्यासाठी मदत करत असतो. म्हणूनच रक्तदान हेच खरे श्रेष्ठदान आहे '' असे प्रतिपादन रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी श्री. हरीषजी बोहरा यांनी केले. पुढे ते म्हणाले, ''कै. मदनलालजी बोहरा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा अतिशय चांगला उपक्रम राबवला आहे . यापुढे अशा समाजपयोगी उपक्रमाचे आयोजन करावे'' .

श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजीचा एन.एस.एस. विभाग व नाईट कॉलेज, एन. एस. एस .विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने होते. ते म्हणाले, ''राष्ट्रीय सेवा योजनेमधून महाविद्यालयातून विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेचे गुण विकसित व्हावेत यासाठी प्रयत्न केले जातात.

आजच्या याच विद्यार्थ्यांकडून भविष्यामध्ये राष्ट्राची सेवा करणारे समाज सुधारक तयार होत असतात. म्हणून रक्तदान सारखे उपक्रम महाविद्यालयाने सतत आयोजित केले गेले पाहिजेत'' हे रक्तदान शिबिर आधार ब्लड बँक, इचलकरंजी यांच्या सहकार्याने आयोजित केली होते. याप्रसंगी आधार बँकेचे डॉ. जाधव, शीमोन हेगडे, अभिनया पाटील , शुभदा हजारे, विनायक माने हे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी दोन्ही महाविद्यालयातील ३० पेक्षा अधिक विद्यार्थी विद्यार्थिनीनी रक्तदान केले.

महाविद्यालयाचे एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. अमीन बाणदार, उपप्राचार्य डॉ. एन. एम. मुजावर, ग्रंथपाल एम. पी. केसरकर, मुख्य लिपिक अनोश गायकवाड तसेच नाईट कॉलेजचे एन. एस. एस. विभाग प्रमुख डॉ. मुंडकर, डॉ. कोरे व दोन्ही कॉलेजचे विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## महाविद्यालय व समाजवादी प्रबोधिनीमध्ये सामजस्य करार



श्री व्यंकटेश महाविद्यालय व समाजवादी प्रबोधिनी या दोन संस्थांमध्ये सामजस्य करार करण्यात आला. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक याचबरोबर व्याख्याने, कार्यशाळा, परिसंवाद, अभ्यास शिबिरे या उपक्रमांबाबत दोन्ही संस्थांमध्ये हा करार केला. हा करार पुढील पाच वर्षांसाठी असणार आहे. सामंजस्य करारपत्र प्राचार्य डॉ. विजय माने यांनी समाजवादी प्रबोधिनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी यांच्याकडे सुपूर्द केले.

करारावर डॉ. डी. एस. कांबळे, प्रा. एम. पी. केसरकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. समाजवादी प्रबोधिनीच्या माध्यमातून धर्मनिरपेक्षता, लोकशाही, संघ राज्यीय, एकात्मता या संकल्पनेच्या माध्यमातून समाजवादी समाज रचना बनविण्याचे विविध चर्चासत्रे घेतली जातात. सामान्य पातळीवर विद्यार्थ्यां मध्ये व्यक्तिमत्त्व विकास, भाषण कौशल्य, संभाषण कौशल्य विकसित होण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तीमार्फत मार्गदर्शन गरजेचे आहे. त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रायोगिक शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन करण्यास समाजवादी प्रबोधिनीचे मोठे सहकार्य लागेल. तसेच प्रबोधिनीच्या वाचनालयामार्फत विविध भाषेतील साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल, दोन्ही संस्थांमधील अदान प्रदानामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास चांगला होईल, असे मत प्राचार्य डॉ. माने यांनी व्यक्त केले. यावेळी प्रा. डॉ. एन. एम. मुजावर, प्रा. अमीन बाणदार, ग्रंथपाल एम. पी. केसरकर उपस्थित होते.

## प्रोफेसर पदी नियुक्ती झालेबद्दल डॉ.एन. एम. मुजावर यांचा सत्कार



सातत्यपूर्ण कष्ट करण्याची तयारी व गुणवत्ता यांचा संगम म्हणजे डॉ. एन. एम. मुजावर हे होय'' असे गौरवोद्गार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाने श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एन. एम. मुजावर यांची 'प्रोफेसर'पदी बढती दिल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभामध्ये ते म्हणाले, ''महाविद्यालयातील प्रोफेसर म्हणून बढती मिळालेले डॉ. एन. एम. मुजावर हे पहिले प्रोफेसर आहेत. संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी, विद्यापीठाच्या विविध समित्यांमध्ये केलेले काम, अध्यापनाचे कार्य, विषय तज्ञ म्हणून केलेले कार्य हे खरोखरच उत्तम असून त्यामुळे प्रोफेसर पदावर बढती मिळाली. याप्रसंगी बोलताना सत्कार मूर्ती डॉ. एन. एम. मुजावर म्हणाले, ''शैक्षणिक क्षेत्रात होत जाणारे बदल स्वीकारून आपणही स्वतःमध्ये व आपल्या अध्यापन कार्यामध्ये बदल करणे गरजेचे असून अध्यापन कार्यास संशोधनाची जोड देऊन काम केल्यास यश निश्चित मिळते''. सत्काराबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

## महाविद्यालयात 'ग्राहक संरक्षण कायदा' विषयाचे व्याख्यान



श्री. नारायणराव बा. शिक्षण संस्थेच्या श्री व्यंकटेश महाविद्यालयात इकॉनॉमिक्स असोसिएशनच्या वतीने दि. २१ डिसेंबर २०२१ रोजी 'ग्राहक संरक्षण कायदा' या विषयाचे व्याख्यान घेण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ. शकुंतला पाटील मॅडम (अर्थशास्त्र, कॉमर्स विभाग प्रमुख जयवंत महाविद्यालय, शहापूर) यांनी ग्राहक संरक्षण कायदा १९८६ व १९१९ यातील फरक, ग्राहक संरक्षण कायदा तरतुदी, ग्राहक मंच भूमिका, कार्यपद्धती, ग्राहकांचे हक्क, जबाबदाऱ्या याविषयी व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एन. एम. मुजावर सर यांनी ग्राहक संरक्षण कायदा व ग्राहक जागरूकता या विषयी काही उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.एस.आर. ठाकर मॅडम, प्रमुख पाहुण्यांची ओळख सौ. एस. एस. कदम मॅडम, आभार डॉ. डी. एस कांबळे सर, सुत्रसंचालन विद्यार्थिनी कु. मधुरा मुसळे यांनी केले.

## इंग्रजी शब्दसंपदा वृद्धि तंत्र व कौशल्य कार्यशाळा संपन्न



महाविद्यालयामध्ये इंग्रजी असोसिएशनमार्फत इंग्रजी शब्द संग्रह वृद्धी तंत्र व कौशल्य या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या दिवशी श्री. अभिजित परांजपे यांनी ऑनलाइन पद्धतीने स्पर्धा परीक्षेसाठी इंग्रजीची तयारी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये इंग्रजी विषया बाबतचे महत्त्व सांगत त्याची तयारी आपण कशी केली पाहिजे याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी डॉ. अरुंधती पवार यांनी दैनंदिन व्यवहारातील 'इंग्रजी शब्द संपदा' या विषयावर महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी शब्दाचा उच्चार, उपयोग व शब्दसंग्रह वाढविण्यासाठीचे विविध मार्ग याबाबत सखोल मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांची ओळख इंग्रजी असोसिएशनच्या प्रमुख डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी करून दिली. तसेच अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने होते. कार्यक्रमाचे आभार सौ .एस. एस. पाटील यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी मोहिनी आंचलिया हिने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यास सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## महाविद्यालयामध्ये 'माझी वसुंधरा' अभियानाचे प्रबोधन



जोपर्यंत आपण पर्यावरणाचे रक्षण करण्याचे ज्ञान प्राप्त करत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने माझी वसुंधरा अभियान आपण साजरे करू शकत नाही. आजची तरुण पिढी फक्त शिक्षण घेत आहे पण खूप कमी विद्यार्थी ज्ञान प्राप्त करत आहेत म्हणून पर्यावरण रक्षण करण्या साठी तरुण पिढीने स्वतःमध्ये बदल करून पर्यावरणाकडे लक्ष दिले तर खऱ्या अर्थाने माझी वसुंधरा अभियान साजरे होईल.' असे प्रतिपादन आर. डी.पिष्टे यांनी केले. श्री व्यंकटेश महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत 'माझी वसुंधरा अभियान' निमित्त व्याख्यानाचे आयोजन केले होते. यामध्ये ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने तर, एन.एस.एस. विभाग प्रमुख श्री. अमीन बाणदार डॉ. डी. एस. कांबळे, ग्रंथपाल एम.पी. केसरकर उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. ऋतुजा लोटके हिने केले. कार्यक्रमाचे आभार क्रीडा शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार यांनी केले यावेळी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## शिवाजी विद्यापीठाच्या आंतर विभागीय पॉवरलिफ्टिंग मध्ये कु. शिवानी मलाबादेने रौप्यपदक पटकविले



शिवाजी विद्यापीठाच्या आंतर विभागीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा शहाजी कॉलेज, कोल्हापूर येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये व्यंकटेश महाविद्यालची बी.बी.ए. भाग ३ मधील कु. शिवानी मलाबादे हिने रौप्यपदक पटकाविले. त्यानिमित्त तिचा महाविद्यालयामार्फत सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने म्हणाले, पॉवरलिफ्टिंग स्पर्धा पुरुषांसाठी ओळखली जाते. पण महिला देखील यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात यश संपादन करू लागल्या आहेत.

महाविद्यालयामध्ये बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकास देखील महत्त्वाचा असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळामधील या विद्यार्थिनीने मिळवलेले हे यश खरोखरच कौतुकास्पद आहे. यामुळे विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना खेळाकडे देखील लक्ष दिले गेले पाहिजे. या सत्कार प्रसंगी उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. एन. एम. मुजावर शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार, डॉ. सौ एस. एच. आंबवडे, ग्रंथपाल एम. पी. केसरकर हे उपस्थित होते.

## महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात साजरा



''वयाच्या अठराव्या वर्षी नवमतदार म्हणून नोंदणी झाल्यानंतर प्रत्येक मतदाराने आपला मताधिकार विवेकबुद्धीने वापरून योग्य उमेदवारास निवडून दिल्यास आपला भारत देश लवकरच महासत्ता होईल. प्रत्येक मतदाराने आपले मत दान न करता आपल्या मताचा अधिकार वापरला पाहिजे. म्हणून सर्वत्र 'मतदान ऐवजी मताधिकार' हा शब्द वापरला गेला पाहिजे'' असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी मांडले. ते महाविद्यालयात एन. एस. एस. विभागामार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय मतदार दिवस प्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.एस. एस. विभाग प्रमुख श्री. अमीन बाणदार यांनी केले. कार्यक्रमांमध्ये मतदार जागृती करण्यासाठी शपथ देण्यात आली. कु. तनुजा पाटील व कु. केतन खोत यांनी सर्वांना शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी तनुजा पाटील हिने केले. कार्यक्रमास ग्रंथपाल श्री. एम .पी. केसरकर शिक्षकेतर कर्मचारी व एन. एस. एस. विभागाचे स्वयंमसेवक उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षेतून उत्तम प्रशासक होण्याची संधी -डॉ. अमर कांबळे



'स्पर्धा परीक्षा म्हणजे मोठे आव्हान नाही, आपल्या आत्मविश्वासाने जेव्हा आपण स्पर्धा परीक्षेला सामोरे जाऊ तेव्हाच एक उत्तम प्रशासक म्हणून आपण यशस्वी होऊ शकतो. म्हणून आपण आता आपले ध्येय निश्चित कराल व चिकाटी, अभ्यास, विश्वासाच्या जोरावर निश्चितपणे स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी व्हाल' असे प्रतिपादन डॉ. अमर कांबळे यांनी केले.

श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये 'स्पर्धा परीक्षा, पूर्वतयारी व अभ्यास कौशल्य'' या विषयावर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत व्याख्यानाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने हे होते. त्यावेळी ते म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी जर या वयामध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली तर अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आपले करिअर घडवू शकतात' कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख स्पर्धा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक एम. पी. केसरकर यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. एन. एम.मुजावर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी स्पर्धा परीक्षांमधील विविध प्रश्नांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.बी. एन. कांबळे, श्री. आमीन बाणदार, श्री. तौफिक नायकवडी, श्री. तालीब मुल्ला हे कार्यक्रमास उपस्थित होते. आभार प्रदर्शन डॉ. डी. एस. कांबळे यांनी केले.

## महाविद्यालयामध्ये कोविड -१९ चे लसीकरण



महाविद्यालयाच्या एन.एस.एस. विभाग व प्राथमिक आरोग्य केंद्र, इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी कोविड-१९ च्या लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने म्हणाले 'महाराष्ट्रातील कोविड-१९ ची दुसरी लाट ओसरत असल्याने महाविद्यालयातील ऑफलाइन शिक्षण सुरू करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे लसीकरण होणे आवश्यक आहे. मास्क, सॅनिटायझर तसेच सुरक्षित अंतर याबरोबरच लसीकरण देखील तितकेच महत्त्वाचे आहे म्हणून या लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.'

महाविद्यालयातील १०० पेक्षा जास्त विद्यार्थी व विद्यार्थिनी या लसीकरण मोहिमेचा लाभ घेतला. या लसीकरण मोहिमेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य व्ही. ए. माने, प्रा. अमीन बाणदार, ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर मुख्य लिपिक अनोश गायकवाड, एन.एस.एस स्वयंसेवक सुलतान सावळखे, शिवतेज पाटील, तौहिद माणगावे, केतन खोत, आशीष कांबळे, तन्मय कुलकर्णी, अक्षय कुंभार तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. तसेच लसीकरण कामासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, इचलकरंजी यांचे सहकार्य लाभले

## महाविद्यालयामध्ये एस. आर. रंगनाथन जयंती उत्साहात साजरी



'भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक' एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त श्री व्यंकटेश महाविद्यालयाच्या ग्रंथालयामार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार घालण्यात आला.

या प्रसंगी बोलताना डॉ. विजय माने सर म्हणाले एस. आर. रंगनाथन यांच्यामुळे भारतातील ग्रंथालय चळवळ विकसित झाली. ग्रंथालय चळवळीमध्ये फार मोठे योगदान रंगनाथन यांचे असून त्यामुळे त्यांना भारत सरकारने 'पद्मश्री' बहुमानाने सन्मानित केले आले. ग्रंथालय शिक्षणाच्या पायाभरणीचे काम एस. आर. रंगनाथन यांनी केले. त्यामळे भावी पिढीला या निमित्ताने त्यांच्या कार्याची माहिती प्राप्त होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे ग्रंथपाल एम. पी. केसरकर यांनी आपल्या मनोगतामध्ये रंगनाथन यांच्या जीवन प्रवास, त्यांच्या ग्रंथालय शास्त्रात दिलेले योगदान याबाबत सर्वांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना ग्रंथालय परिचर श्री. शशांक कवटगे यांनी केली तर सूत्रसंचालन ग्रंथालय परिचर श्री. प्रकाश माने यांनी केले व आभार ग्रंथालय परिचर श्री. अजय वळवी यांनी मानले. कार्यक्रमास सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी-विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या कल्पक 'अविष्कार' भित्तीपत्रकाचे अनावरण



विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुण व नाविन्यपूर्ण कल्पकतेला वाव देण्यासाठी अविष्कार विभाग अंतर्गत विद्यार्थ्यांकडून विविध विषयांवर आधारित साहित्यिक लेख, कविता, रेखाचित्रे संकलित करून महिन्याच्या ५ ते १५ तारखेपर्यंत प्रदर्शित केले जाते. ८ डिसेंबर रोजी 'कोविड१९'चा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर झालेला मानसिक व शारिरिक परिणाम या विषयावर आधारित विविध लेख, कविता प्रदर्शित करण्यात आले.

भित्तीपत्रकाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने सरांच्या हस्ते झाले. सदर विषयाचे पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन, पोस्टर प्रेझेन्टेशन व नाटक सादरीकरण करण्यात आले. यामध्ये बी. कॉम इंटायर आय. टी व बी. कॉम रेग्युलर चे अमृता खोत, अल्फीया अत्तार, सानिका माने, सेजल बोरा, अमृता रजपूत, ऐश्वर्या रणदिवे, प्रतीक्षा कोळी, रोशनी जाधव , श्रुती मोहिते, पुष्पा पाटील, मेघा खोत, साक्षी शिंदे, सानिका बिराज, प्रज्ञा ढाळे, प्रतीक्षा मेंच, मधुरा मुसळे, अनुजा कुलकर्णी, अभिषेक जाधव, प्रथमेश गायकवाड, जमीर शेख इ. विद्यार्थी सहभागी होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन विभाग प्रमुख डॉ. एस. एच. आंबवडे यांनी केले. त्यांना डॉ. एस. आर. ठाकर यांचे सहकार्य मिळाले.

## महाविद्यालयाची कु. आर्या नवनाळे शिवाजी विद्यापीठाच्या कुस्ती स्पर्धेत द्वितीय



महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. आर्या ललित नवनाळे हिने शिवाजी विद्यापीठ अंतर्गत जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी आयोजित इंटरझोनल महिला कुस्ती स्पर्धेत ७२ किलो वजन गटांमध्ये फ्रीस्टाईल प्रकारात द्वितीय क्रमांक पटकाविला. याबद्दल महाविद्यालयात तिच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही. ए. माने म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बौद्धिक विकासाबरोबर शारिरिक विकास देखील महत्त्वाचा असून विद्यार्थिनींने मिळवलेले हे यश खरोखरच कौतुकास पात्र आहे.

'याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. एन. एम. मुजावर व शारिरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार यांच्या उपस्थितीत तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तिच्या भावी वाटचालीस महाविद्यालयामार्फत शुभेच्छा देण्यात आल्या.